# प्रकरण तिसरे

# स्त्री पुरूष तुलना वाड्.मयीन वैशिष्ठ्ये

## प्रकरण तिसरे

## स्त्री पुरूष तुलना वाङ्.मयीन वैशिष्ठये

१९वे शतक हे संपूर्ण भारतीय इतिहासात आणि जडणघडणीत महत्वाचे ठरलेले आहे. इंग्रजी राजवट जसजशी स्थिरावत गेली, तसतसा या देशाचा चेहरामोहरा बदलत गेला. विशेषत: सामाजिक जीवनाच्या संदर्भात हे शतक अधिकच महत्वाचे ठरते. १९व्या शतकापूर्वीचे सामाजिक जीवन आणि १९व्या शतकांतले सामाजिक जीवन असा तुलनात्मक विचार केला तर त्यात जमीनअस्मानाचा फरक जाणवेल. केवळ सामाजिक जीवनच नाही तर धार्मिक, राजकीय व सांस्कृतिक अशा सर्व पातळीवर भारतीय जीवन बदलत गेल्याचे दिसून येते. म्हणून या शतकात अनेक विचारवंतानी वैचारिक कलहाचे शतक, परंपरेचा आंधळेपणाने स्वीकार न करता परंपरेला आव्हान देणारे शतक, मूलभूत प्रश्नांची जाग आणणारे शतक, आत्मपरीक्षणाचे शतक, नव्या शक्तीच्या उपासनेचे शतक असे म्हटले आहे.

"मराठी वाङ्.मयाच्या दृष्टीने नवनवीन लेखनप्रकार ज्या शतकात निर्माण झाली असे हे शतक. या शतकाने मराठी वाङ्.मयाला जी अनमोल रत्ने दिली त्यापैकी ताराबाई शिंदे यांचे स्त्रीपुरूष तुलना १८८२ हे पुस्तक या पुस्तकात स्त्रीपुरूषामधील सारा असमतोल दूर करून स्त्री जातीला पुरता न्याय मिळवून द्यावा अशी खटपट आहे. इतके आधुनिक क्रांतदर्शी विचार इतक्या तर्कशुध्द पध्दतीने एका स्त्रीने मांडलेले मराठी गद्याने पहिल्यांदाच अनुभवले. लोकहितवादी (गोपाळ हरी देशमुख) १८२३ ते १८९८ आणि महात्मा जोतीराव फुले १८२७, १८९० यांच्या लेखणीने ही करामत यापूर्वी केली असली तरी एक स्त्रीने हे धैर्य दाखविल्याचा

हा पहिलाच प्रसंग म्हणावा लागेल. मराठी गद्याचे दुर्दैव असे की, ही आधुनिकता पुढे वाढीस लागावयाच्या ऐवजी लुप्तच झाली. "[१]

"स्त्रीपुरूष तुलना हे निबंधात्मक पुस्तक आहे. ताराबाईच्या मूळसंहिताच्या मुखपृष्ठावरच हे लिहिलेले आढळते ते असे, स्त्री पुरूष तुलना अथवा स्त्रिया व पुरूष यात साहसी कोण हे स्पष्ट करून दाखविण्याकरिता हा निबंध ताराबाई शिंदे यांनी रचिला."[२] म्हणून प्रस्तुत प्रकरणात स्त्रीपुरूष तुलना हा निबंध म्हणून त्याची वाङ्.मयीन वैशिष्ठये कोणती आहेत याचा अभ्यास करावयाचा आहे.

## ३.१ निबंध या वाङ्.मयप्रकाराचे स्वरूप व दिशा निबंधाची व्याख्या :

निबंधाच्या व्याख्या अनेक साहित्यकारांनी केलेल्या आहेत. डॉ. मनोहर अडतेकरांच्या मते, "नि + बंध = एकत्र मांडणे, मुद्दे, विचार प्रसंग एकत्र सुसूत्र मांडणे म्हणजे निबंध."

थोडक्यात एखाद्या विषयाची मुद्देसूद सुसूत्र मांडणी करणे म्हणजे निबंध होय.

यामुळे निबंधाच्या किंवा लेखाच्या या अर्थाला व्याख्येच्या चौकटीत बसविण्याच्या निमित्ताने एखाद्या विशिष्ट विषयावर लिहिलेला नेमस्त आकाराचा किंवा लांबीचा लेख या केलेल्या व्याख्येत विषयाचा विधिनिषेद नाही. पण निबंध आणि प्रबंधात मात्र फरक आहे जसे प्रबंधात कोणत्याही विषयाचा सांगोपांग परिपूर्ण विचार केलेला असतो. उलट निबंधात सर्व नव्हे पण काही मुद्दे मांडलेले असतात. प्रबंधाचे मुख्य आवाहन वाचकाच्या तर्कशक्तीला आणि विवेचक बुध्दीला असते तर निबंधाचे आवाहन वाचकाच्या सर्व सामान्य बुध्दीला असते. निबंधातील वादविवाद युक्तीवाद विचारांची फोड ही वाचकाच्या सर्वसामान्य बुध्दीची जाणीव बाळगूनच लेखक करीत असतो.[३]

### ३.२ निबंधवाङ्.मयाचा जन्म :

१८१८ ते १८७४ या अव्वल इंग्रजी म्हणून संबोधण्यात येणाऱ्या कालखंडात निबंधाचा प्रथम जन्म झाला. या कालखंडातील वाङ्.मयाचे वर्णन करताना देशाभिमानशून्य स्वत्वहीन भाषांतरात्मक अनुकरणात्मक शालेय सामान्य अशा विशेषणांची पुष्पांजली वाहण्यात येते. त्याची कारणमिमांसा पुढीलप्रमाणे केली जाते. वाङ्.मयप्रकार हे इंग्रजी वाङ्.मयप्रकाराच्या अनुषंगाने हिन्दूस्थानात अवतरले. इंग्रजीतील वाङ्.मयप्रकारांची मराठीत भाषांतरे करण्यात आलेली होती. इंग्रजांमुळे सामाजिक सुधारणा झाल्या. सतीची चाल बंद झाली. विधवा पुनर्विवाह, स्त्रीशिक्षण, बालविवाह बंदी या सारख्या सुधारणामुळे इंग्रज सरकारचे कौतुक व गौरव केला जात असे. पुस्तके छापण्यासाठी छापखाने निघाले. त्यातून पुढे नियतकालिके आणि मासिके निघाली आणि या नियतकालिकामधून अनेक वाङ्.मयप्रकारांचा जन्म झाला. आगरकर, टिळक, केळकर, शिवराम परांजपे, अच्युतराव कोल्हटकर, माडखोलकर, पा.वा. गाडगीळ व प्रभाकर पाध्ये अशा अनेक वृत्तपत्रकर्त्यांनी मराठी निबंधाला समृध्द आणि समर्थ केले. एकूणच १९व्या शतकातील मराठी निबंधाचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, या काळातील राजकारण असो वा समाजकारण असो वाङ्.मयातील प्रश्न असो वा पुनर्विवाह धर्मांतर, वादविवाद या विषयीचे असो वा हल्ले, प्रतिहल्ले चढविण्याचे असो ते सुध्दा निबंधाच्या द्वारेच व्यक्त केले जात असत. अशाप्रकारे मराठी निबंधाच्या विकासाला अनेक संस्था देखील कारणीभूत झाल्या. अशा लेखनामधूनच मराठी निबंध आपल्या मताचे आणि दृष्टीकोनाचे क्वचित एकांगी पण तितकेच तडफदार प्रतिपादन करण्यास शिकला.

## ३.३ निबंध वाड्.मयाची वाटचाल :

"निबंधाचे वाड्.मयीन स्वरूप प्रारंभी कसे होते व पुढे क्रमाक्रमाने कालांतराने त्यामध्ये उत्क्रांती होत गेली हे पाहणे देखिल जरूरीचे वाटते. डॉ. अळतेकरांच्या मते, निबंधाचा आणि लांबीरूंदीचे अंगरखे चढवून वाचकाना रिझवितो तर अभ्यासकाना फसवितो. चिपळूणकर, लोकहितवादी, आगरकर, टिळक, परांजपे यांच्या निंबंधाचे स्वरूप पाहिले की याची प्रचिती येते. पेशवाईतील पायघोळ अंगरखा घालावा त्याप्रमाणे चिपळूणकरांचा प्रबंधवजा निबंध आहे. तर डोक्यावर पगडी किंवा पागोटे अंगावर लांब कोट आणि उपरणे पायात लालभडक जोडे असा आगरकर टिळक यांच्या केसरी आणि सुधारकामधून प्रसिध्द झालेल्या लेखांचा थाट आहे. आखूड कोट आणि डोक्यावर टोपी अशा सुटसुटीत पोषाखाचे केळकरांचे निबंध वाटतात. काव्याचे अलंकार घालून परांजप्यांचे निबंध मिरवतात. पत्रकर्त्यांच्या स्फूट रचना आणि प्रासंगिक विचार हे पंचा नेसणाऱ्या कोकणातील भटजींची आठवण करून देते तर फडके व खांडेकरांनी नावारूपाला आणलेल्या ललित निबंधाच्या पोषाखाचे वर्णन करण्यास शब्दही अपूरे पडतात. " [४]

"चिपळूणकर हेचआधुनिक मराठीतल्या रचनासौष्ठवाने युक्त असलेल्या प्रौढ आणि प्रतिष्ठित निबंधाचे आद्य निर्माते आहेत. त्यानी हा वाड्.मय प्रकार इंग्रजीतूनच घेतलेला आहे. चिपळूणकरांच्या निबंधात भावनात्मकता आणि विचारप्रवर्तकता यांचे समतोल प्रमाण आढळून येते. टिळक - राजवाडे - आगरकर यांच्या निबंधात विचारप्रवर्तकाचा उत्कर्ष झालेला असून परांजपे आणि अच्युतराव कोल्हटकर यांचे निबंध भावनात्मकतेच्या प्रकर्षाने फुललेले आहेत. केवळ सौंदर्यदर्शनात न रमता समाजाच्या जागृतीला आणि उन्नतीला उपकारक होतील अशा सद्भावनांचा आणि सदविचारांचा प्रचार करणे हे मुख्यत: मराठी निबंधाने आपल्यापुढे ध्येय ठेवलेले आहे. त्याकरिता कधी शास्त्रशुध्द युक्तीवादाचे, कधी

बुध्दिनिष्ठ कोटिक्रमाचे कधी बोचक उपहासाचे, कधी विदग्ध वक्रोतीचे अशी नानाविध महाराष्ट्रात सामाजिक आणि राजकीय जागृती घडवून आणण्याचा श्रेयाचा वाटा प्रस्तुत कालखंडातील निबंधेतर वाङ्.मयापेक्षा निबंधानाच मिळाला पाहिजे. टिळकांच्या निबंधानी लोकाना राजकिय शिक्षण दिले. आगरकरांच्या निबंधानी व्यक्तीस्वातंत्र्याच्या आणि समतेच्या तत्वावर समाजाचे नियमन करण्याचा संदेश दिला.

पराजप्यांच्या निबंधानी पारतंत्र्याविषयी संताप उत्पन्न करून स्वातंत्र्यप्राप्तीची अभिलाषा प्रज्वलीत केली.

राजवाड्यांच्या निबंधानी मायभोषेच्या अभिमानाचे जळजळीत स्वरूप व्यक्त केले. [५]

"अव्वल इंग्रजीत निबंधाची लिहिण्याची धाटणी, विचार आणि लकबी थोड्याफार प्रमाणात इकडे आल्या. त्यात आमच्या आचार विचारांचे संस्कार मिसळले आणि त्यामधून एक वेगळ्या वृत्तीचा निबंध निर्माण झाला. प्रारंभी निघालेली वृत्तपत्रे केवळ माहिती गोळा करणारी नव्हती. तर ती मतपत्रेही होती. अग्रलेखात किंवा इतर मथळ्याखाली प्रसिध्द होणाऱ्या लेखात लेखक अनेक विषयावरील आपले विशिष्ठ मत कळकळीने आणि आवेशाने प्रतिपादन करीत असत. प्रारंभी अशा प्रकारचे लेख त्रोटक अधिक प्रासंगिक, वैयक्तिक बरेच ओबडधोबड असत. मांडणीत समतोलपणा नसून विचार एकांगी असत. असे हे लेख सदोष असले तरी ते एका व्यक्तीचे असत आणि अशा बऱ्या वाईट आत्मानुभूतीमधून वृत्तपत्रातील निबंध वाङ्.मयात आढळणाऱ्या वैशिष्ठयपूर्ण व्यक्तिमत्वातून निर्माण होणाऱ्या वाङ्.मयीन गुणावगुणांचा जन्म झाला. मराठी निबंध वस्तुनिष्ठ व व्यक्तीनिरपेक्ष न झाल्यामुळे केवळ लेखकाच्या वैयक्तिक अनुभूतीपासून निर्माण होणारे व वाङ्.मयीन वृत्तीला आवश्यक

असणारे अनन्यसाधारणत्व कळत वा नकळत म्हणा निबंधात आले. अर्थात ते लालित्य आपल्याकडील निबंधकारांच्या निबंधात आले."[६]

## ३.४ लेखकाच्या व्यक्तिमत्वाची छाप :

"चैतन्याचे आणि सौंदर्याचे अधिष्ठान लेखकाचे व्यक्तिमत्व असते. त्यामुळे कोणत्याही लेखकाच्या चार ओळी जरी वाचल्या तरी त्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्वाची वाचकाला अटकळ बांधता येते. जिवंत आणि रसरशीत व्यक्तिमत्व स्वतंत्र आणि अभिनव दृष्टिकोन या वैशिष्ठयांचे वास्तव चिपळूणकर टिळक, आगरकर यांच्या लेखनात दिसते. उदा. टिळक पुढारी म्हणून त्यांचा निर्भयता निग्रहीपणा कधी कधी वकिली, वादपटूता निबंधात सापडतो तर कधी कधी आगरकरांचा प्राजंळपणा, विनोदबुध्दी याची प्रचिती येते. अनन्यसाधारणत्व हे लेखकाच्या सर्वसामान्याहून वेगळ्या असणाऱ्या व्यक्तिमत्वावर अधिष्ठित असते. अनन्यसाधारणत्व प्राप्त झालेल्या अनुभवातून साकार झालेल्या कलाकृतीना स्थलकालाचे बंधन नसते. यामुळे व्यक्ती म्हणून लेखक दिवंगत झाला तरी तो आपल्या व्यक्तिमत्वाने म्हणजेच वाङ्‌मयाने अमर होतो."[७] सारांश – कोणत्याही कलाकृतीतील आशय अभिव्यक्ती आकार आकृती आणि शैली याचा जन्म लेखकाच्या वैशिष्ठयपूर्ण व्यक्तिमत्वातून होतो.

## लोकशिक्षण लोकजागृती :

"लोकशिक्षण आणि लोकजागृती प्रचार, निदान कमीत कमी सहेतुकता आणि उपयुक्तता या शब्दामधून प्रकट होणाऱ्या कल्पनांचे महाराष्ट्राला फार वेड होतो. सामान्यपणे शब्दसुष्टीचे इश्वर साहित्याचा साधन म्हणून उपयोग करतात. जेथे नाटक, कादंबरी, कविता

अशा निर्भेळ ललितप्रकारांचाही उपयोग लोकजागृतीसाठी आणि प्रचारासाठी करण्यात आला तेथे निबंधासारख्या ललित वाङ्.मय प्रकारांचा उपयोग लोकशिक्षण, लोकजागृतीसाठी उपयोग करण्यात आला. "[८]

## ३.५ शैली :

निबंधाच्या शैलीबद्दल निश्चित असे काही लिहिलेले आढळत नाही. कारण जसे लेखक तसेच निबंध असतात. निबंधाची शैली लेखकपरत्वे व विषयपरत्वे बदलत जाते. "शैली ही लेखकाच्या वृत्तीतून किंवा प्रवृत्तीमधून म्हणजेच विशिष्ठ मनोधर्मातून निर्माण होत असते. प्रत्येक लेखकाच्या स्वभावातील किंवा व्यक्तीमत्वातील प्रमुख प्रवृत्तीचे परिक्षण केले की तो लेखक कोणत्या पध्दतीने किंवा रितीने एखादी वाङ्.मयीन कृती घडवेल याची अटकळ बांधता येते."[९] लेखनाची म्हणून जी एक शैली त्या विषयावर प्रभुत्व मिळविलेली आणि लोकांची मते आकर्षिली जाणारी असते एवढे खरे.

## ३.६ १९२० ते ५० या कालखंडातील निबंधाचे स्वरूप आणि परिवर्तन :

१९२० ते १९५० या तीन दशकात अनेक लेखकानी मराठी निबंध वाङ्.मयस्वरूपाचे विचारधन आणि भावबळ वाढविण्याचे श्रेय संपादिलेले आहे. तरीसुध्दा चिपळूणकर टिळक आगरकर परांजपे, केळकर यांच्या कर्तृत्वावर तेजस्तितेत आणि परिणामकारकतेत मात करू शकेल असे सामर्थ्य हस्तगत करण्याच्या बाबतीत हा लेखकवर्ग निष्प्रभ ठरलेला आहे. तात्पर्य हा की पूर्वी कधीही अनुभवली नव्हती अशी वैचारिक आणि भावनात्मक जागृती १९२० च्या पूर्वीच्या अर्ध शतकात महाराष्ट्राने अनुभवली. हा जागृतीचा उद्रेक अक्षरशः अभूतपूर्व स्वरूपाचा होता. टिळक आगरकरांच्या हाती निबंधाला जागृतीची व लोकजीवन संपर्काची जी कार्यक्षम बैठक होती ती पुढे हळू हळू सुटत गेलेली आहे. केळकरांच्या

वेळेपासून या बदलाची चिन्हे उमटू लागली. लोकशिक्षण आणि वाङ्.मयगुण विलक्षण ही जर निबंधाची दोन महत्वाची अंगे मानली तर स्थूलमानाने असे दिसून येते की, १९२० च्या आधी त्याचे पहिले अंग विशेष उठावदार राहिलेले आहे. १९२० नंतर निबंधाचे दुसरे अंग विशेष टवटवीत आणि अल्हादजक होत गेले. विचारविलास भावनाविलास आणि कल्पनाविलास या तिन्ही आघाड्यावर तो आता निश्चित विकासाच्या दिशेने वाटचाल करू लागलेला आहे." [१०]

अशाप्रकारे निबंध या वाङ्.मयप्रकाराचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, निबंध वाङ्.मयाचा जन्म अव्वल इंग्रजी काळात १८१८ ते १८७४ या काळात झाला आणि पुढे तो वाङ्.मयप्रकार भारतीय लेखकाच्या हातात हात घालून पुढे वाटचाल करीत राहिला. जसे लेखक तसे निबंध लिहिले जावू लागले. लिहिले जात राहतील. त्यात क्रमाक्रमाने उत्क्रांती व प्रगती होत गेली आणि अजूनही होईल यात कांही वाद नाही.

निबंध या वाङ्.मयप्रकाराच्या वैशिष्ठयानुसार ताराबाई शिंदे लिखित स्त्रीपुरूष तुलना या निबंधाचा अभ्यास व वाङ्.मयीन गुणवत्ता अभ्यासने आवश्यक आहे.

## ३.७ स्त्रीपुरूष तुलना या निबंधाची वैशिष्ठये :

ताराबाई शिंदे यांनी लिहिलेले "स्त्रीपुरूष तुलना" हे ४९ ते ५० पानाचे छोटे पुस्तक आहे. ते ताराबाईनी १८८२ मध्ये लिहिलेले आहे. पण पुढे महात्मा फुल्यांचा अपवाद वगळता जवळ जवळ १०० वर्षे अज्ञातवासात राहिल्याप्रमाणे होते. पुढे इ.स. १९७४ मध्ये डॉ. सं.ग. मालशे यानी ही प्रत अत्यंत कष्टाने शोधून काढली व प्रत्यक्ष बुलठाण्याला जावून कै. ताराबाईबद्दल माहिती गोळा केली आणि प्रस्तावनेसह संपादित केली. पुढे डॉ. नागनाथ

कोतापल्ले आणि विलास खोले या दोन व्यक्तीनी प्रस्तावनेसह संपादित केलेले आहे. पुढे लेखिका मृणालिनी जोगळेकर यानी स्त्री अस्मितेचा अविष्कार एकोणिसावे शतक ताराबाई शिंदे व जनाक्का शिंदे या दोन व्यक्तीवर लेखन केले. उपरोक्त अभ्यासकानी ताराबाई शिंदे यांच्या निबंधाचा उल्लेख फक्त पुस्तक असा केला असला तरी ते एक निबंधात्मक पुस्तक आहे. खुद्द ताराबाई शिंदे यांच्या मूळसंहितेवर मात्र निबंध असा निर्देष केलेला आहे. तो पुढीलप्रमाणे -

स्त्रीपुरूष तुलना अथवा स्त्री व पुरूष यात साहसी कोण हे स्पष्ट करून दाखविण्याकरिता हा निबंध ताराबाई शिंदे यानी रचिला. वरील मजकूर ताराबाई शिंदे लिखित पुस्तकाच्या मुखपृष्ठावर दिलेला आहे. यावरून ही निबंध आहे असे सिध्द होते. म्हणून या पुस्तकाचा निबंध वाड्.मय म्हणून या निबंधाची वैशिष्ठये पाहणे आवश्यक वाटते.

## ३.८ तत्कालीन सामाजिक परिस्थिती :

"ताराबाई शिंदे" यानी जेंव्हा हा निबंध लिहिला त्याला तत्कालीन सामाजिक परिस्थिती कारणीभूत होती. १९व्या शतकातील सामाजिक परिस्थितीचा अभ्यास केला असता असे दिसून येते की त्या काळात लोक धार्मिक वृत्तीचे अंधश्रध्दाळू स्त्री शिक्षणास विरोध, विधवा पुनर्विवाहास बंदी, विधवांचे केशवपन, सतीची चाल, बालविवाहाची चाल, स्त्रियानी घोषात राहणे एकूणच पुरूषप्रधान संस्कृतीचे वर्चस्व होते. अशा काळात जर का एखाद्या स्त्रीच्या हातून एखादा प्रमाद घडला तर त्यावर टिकेचा हल्ला केला जाई व सर्व स्त्री जातीला हीन केले जाई. हे ताराबाईनी पाहिले, अनुभवले म्हणून त्यानी एक स्त्री या नात्याने स्त्री मानव जीवनात किती कठीण आहे, स्त्रियाशिवाय पुरूषाला काहीही किंमत नाही. तरी देखील पुरूष स्त्रीकडे बोट करून पदोपदी स्त्रीचा अपमान करतो हे किती खोटे आहे. हे

दाखविण्याकरिता अगदी कडक शब्दात स्त्री शक्तीचे एकेक पदर उलगडून दाखवत स्पष्ट केलेला आहे. खरोखर ताराबाई शिंदे या मराठा जातीतील स्त्री कडून स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराविरूध्द आवाज उठविण्याच्या साहसामधून पुरूषांच्या दुर्गुणांची मिमांसा करणाऱ्या आणि स्त्री व पुरूष हे दोघंही समान आहेत. हे दाखविण्याच्या प्रयत्नातून एक अतिशय उत्कृष्ट दर्जाची जिला अक्षय कलाकृती म्हणावी अशी कलाकृती निर्माण झाली. या कलाकृतीचे अंतरंगही तसेच उत्कृष्ट आहे.

## ३.९ स्त्री पुरूष तुलना निबंधाची प्रेरणा :

स्त्री पुरूष तुलना निबंध ताराबाई शिंदेना रचण्यासाठी जशी तत्कालीन परिस्थिती विशाष घटना घडली आणि त्या घटनेचा परिणाम ताराबाईवर इतक्या खोलवर झाला त्यातून स्त्री व पुरूष हे शेवटी संसाररूपी रथाची दोन समान चाके कशी आहेत हे स्पष्ट करून दाखविण्यासाठी एक वाङ्.मयीन कलाकृतीच निर्माण झाली. ती घटना अशी, १८८१ मे महिन्यात द 'टाईम्स ऑफ इंडिया' या वृत्तपत्रात एक दिवस विजयालक्ष्मी नामक २४ वर्षाच्या ब्राह्मण विधवेने केलेली भ्रूणहत्त्या, तिला झालेली फाशीची शिक्षा नंतर फाशीची शिक्षा रद्द करून ५ वर्षे सक्तमजूरीची शिक्षा आणि पुढे 'पुणे वैभव' सारख्या सनातनी वृत्तपत्रानी स्त्री जाती विरूध्द उठविलेली टीकेची झोंड हे या दीर्घ निबंधाचे तात्कालिक निमित्तकारण आहे आणि या एका घटनेवरून त्यांनी हा लेखन प्रपंच मांडलेला आहे आणि घटनेवरून त्यानी हा निबंध लिहून विशेषकरून पुरूषाना उपदेश करतात. म्हणून हा निबंध उपदेशपर म्हणावासा वाटतो. त्या संपूर्ण समाजाला उद्देशून म्हणतात,

"अहो पुनर्विवाह न करण्याची चाल महान रोग्याप्रमाणे अनेक ठिकाणी व जातीत पसरली आहे. त्यामुळे किती लाखो व कोट्यावधी स्त्रिया वैधव्याचे असह्य दुःख कसे कसे

भोगीत असतील व भोगितात व त्यापासून कसे कसे अनर्थ होत आहेत व होत असतील याची कल्पनासुध्दा करता येत नाही. कारण मनोनिग्रह करून मनुष्य वस्तीत राहून स्त्री धर्मरक्षण होणेच नाही. " [११]

येथे कळत नकळत त्या उपदेश करतात की, स्त्रीला जर ऐन जवानीत वैधव्य प्राप्त झाले तर सहाजिकच तिच्या हातून एखादा प्रमाद घडण्याची शक्यता आहे. त्यापेक्षा विधवा पुनर्विवाहास समाजाने संमती देवून त्यांच्याकडून होणारे अनर्थ थांबवावे, त्या अबलांच्या दृष्कृत्यांबद्दल जे वर्तमानपत्रात छापून येते तो महान अर्थ मिटवून टाकण्यात कुणी तरी पुढे यावे असे अवाहन करतात. यासाठी त्या तारा या वालीवानराच्या बायकोच्या सुग्रीवाबरोबर झालेल्या पुनर्विवाहाचे उदाहरण देतात.

"रामचंद्रजीने सुग्रीवाची कीव करून वालीला कपटाने मारून ताराचे लग्न सुग्रीवाबरोबर लावून दिले."

एक गंधर्व विवाह "होऊन पुन: शांतनू" व पंडूराजाबरोबर पाणी ग्रहण केले, तो नाही का पुनर्विवाह झाला ? [१२] याप्रमाणेच ताराबाई काही कुमारी मातांची उदाहरणे देतात, "द्रौपदी पाच नवऱ्याची बायको असूनही कर्ण महाराजांचे आंतर्यामी चिंतन करीत होती की नाही, सत्यवती, कुंती त्यांनी आपले कुमारदशेतच एकीने श्रीवेदव्यास एकीने कर्ण असे दोन पुत्र प्रसवल्या तरी पटातच नांव वा रे देव ! वा रे ऋषी ! एका चडीत एक." [१३]

ताराबाईंच्या मते सामाजिक जीवनात लोक धर्माला अतिशय मानत होते. शासन पुराणाच्या आधाराने उड्या मारणाऱ्या शास्त्रकर्त्यांचे दात त्यांच्याच घशात घालणाऱ्या प्रयत्न करून कळत नकळत देवाच्या हातून, शास्त्र, पुराणातील स्त्रियांच्या हातून इतके प्रमाद

घडूनही त्यांचे नांव पटांतच. मग वास्तव जीवनात जर स्त्रियांकडून असे अनर्थ घडले तर हा समाज स्त्रियांना दोष का देतो ? असा सवाल करतात आण त्यातून कळत नकळत लोकांना उपदेश करण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्राचीन वाङ्.मयातील उदाहरणे दिली आहेत ती तर्कशुध्द वाटतात. तद्वतच सनातन्यांना प्रखर विरोध करण्यासाठी दिलेला सज्जड पुरावाच आहे. पुढे त्या म्हणतात,

"तुम्ही बलाढ्य पराक्रमी असताना गरीब विधवा स्त्रियांना या लज्जेच्या दरीतून ओढून सर्व जातीला मोडून एकदम त्यांच्या कपाळी सौभाग्याचा मळवट भरून सौभाग्यशाली करण्यास तुमच्याने पुढे होववत नाही काय ? " [१४]

"१९व्या शतकातील सनातनीवृत्तीचे लोक, परंपरावादी, रूढी बंधनामध्ये अडकलेले धर्माचा धार्मिकरूढीचे पालन करणारा अशा काळात ताराबाईची लेखनी पुरूषांचे दुर्गुन दाखविण्यासाठी व शास्त्र पुराणांचे दाखले देत देत सडेतोडपणे लिहिते, विचारांचे जाळे स्वरपणे संचार करू लागते त्याचे अनेक दाखले या निबंधात दिसून येतात. "

स्त्रीधर्म म्हणजे काय ?

" पतिने लाथा मारिल्या, शिव्या दिल्या, दुसऱ्या रांडा ठेवविल्या, नवरूजी दारू पिवून आले, फितूरी चहाडी खजिना लुटून, लाच खाऊन जरी घरी आले तरी स्त्रियांनी आपले हे कोणी जसे काही कृष्णमहाराजच गौळ्याचे दही दूध चोरून चंद्रावळीला कलंक लावून आलेत असे समजून परमात्म्यासारखीच यांची मोठ्या हसतमुखाने देवासारखी पूजा करावी. "[१५]

### ३.१० पुरूषांच्या सभेबद्दल बोलतात –

सभा जमली म्हणजे तेथे काय मोठी शालजोडी, लफेदार पागोट्याचा झोक लावून डौलाने जावून पल्लाभर सुपत्री, दहा गाडे विड्याची पाने, हारतुरे, एक हौदभर गुलाबी अत्तराचा सत्यानाश करून घरी यावयाचे एवढेच काय ते दुसरे काही नाही. या अशा तुमच्या पोकळसभा तर तीस पस्तीस वर्षापासून चालल्या आहेत. उपयोग काय ? [१६]

स्त्रियांच्या शूरपणाबद्दल बोलताना म्हणतात,

"झाशीच्या राणीसारख्या फार नकोत पण एक चारपाचशे स्त्रियांना निसंग होवून हातात संगिनी घेऊ द्या. मग पहा तुमची कशी दुर्दशा उडेल ती. अरे मग चुलीजवळ सुध्दा लपण्यास जागा मिळणे कठीण. " [१७]

पुरूष स्वत: अनेक दुर्गुणानी भरलेले असताही स्त्रियानाच बदनाम करू पाहणाऱ्या पुरूषावर कठोर आघात करण्याच्या दृष्टीने तारबाईनी आपली लेखणी मुक्तपणे चालविलेली आहे. जख्ख म्हातारपणी देखिल अल्पवयीन बालिकेशी लग्न करणारे पुरूष, पहिली पत्नी निर्वतताच दुसऱ्या लग्नाला सज्ज. संतती नाी या सबबीवर एकीनंतर दुसरी, तिसरी, चौथी बायको करायला उत्सुक असणारे नवरे मित्राशी कपटीपणे वागून त्याच्या बायकोशी संधान बांधणारे पुरूष साधूसंन्याशी व बुवामंडळींचे दांभिक व बुवाबाजीचे वर्तन "दक्षणेचे पैसे साचवून रांडेकडे" जाणारे महाभाग या सर्वांची दखल एकदम कडक शब्दात ताराबाईनी घेतली आहे. स्त्रीला फूस लावून कामवासनेची पूर्ती होवून स्त्री एकदा गर्भवती झाली म्हणजे "तू केलेस ते भोग" असे उद्गारतात म्हणून ताराबाई अतिशय संतापाने म्हणतात, "तुमच्यापेक्षा

सर्प बरा. तो डसल्याबरोबर प्राण तरी जातो." पण तुमचे जवळ जे विष आहे ते नित्य नित्य शरीरास असह्य दुःख देवून प्राण घेते. [१८]

"स्त्रीपुरूष तुलना" या निबंधाचे लेखन ताराबाईनी इतक्या पोटतिडकीने केलेले आहे की त्या लेखनातून काही काही प्रसंग असे काही उभे केलेले आहेत की आज शंभर वर्षे झाली तरी देखिल जीवंतच वाटतात. तशी बरीच उदाहरणे येथे दिसून येतात.

'आताचा पतिव्रतापणाबद्दल सांगताना त्यानी जे संवाद व्यक्त केलेले आहेत त्याचा चैतन्य आणि जीवंतपणा दिसून येतो.

"आता नवऱ्यानी पाणी मागितले म्हणजे बाईसाहेब म्हणायच्या, अहो, मलापण केंव्हाची तहान लागली आहे. त्या तांब्यात पाणी आहे ते तुम्ही प्यानी मलाही एक प्यालाभर द्या. हा बाळ्या मला उठूच देत नाही. मी काय करू ! "

"आता आटपले की, नाही, वाढा, नऊ वाजले असे म्हटले की, हिकडून जबाब, हो , आले आटपत, वाढते रोजचे मेले नऊ कपाळी बसलेच. अहो, काही डाळ भाजी शिजली तर पाहिजे ना ? का तसेच तांदूळ वाढू पानावर ? नित्याचेच आहे. एका दिवसाचे नाही काही. आता विड्याबिड्याचे नांव घेतले की ते कोनाड्यात तबक आहे घ्या एक विडा करून तेवढा विडा करवत नाही की काय ? सारे जसे हातातच पाहिजे." [१९]

हा संवाद पाहिला की त्यात जीवंतपणा जाणवतो व १०० वर्षानीसुध्दा आज जर पतिव्रतापणाची पध्दत पाहिली तर अगदी अशीच आहे. कारण आजकाल नवरा आणि बायको दोघंही काही ना काही कामं करतच असतात. तसेच आपल्या आचारविचारातील त्या

त्या शतकानुसार झालेल्या बदलामुळे सुध्दा हल्ली असे संवाद घडतात. जे १०० वर्षापूर्वी ताराबाईनी व्यक्तकेलेले आहेत.

तारबााईनी आपल्या निबंधात लग्नाच्या तऱ्हा बाबत चार प्रकाराच्या विवाहाच्या तऱ्हा सांगितल्या आहेत, १) कित्येक बाप आपल्या दहा अकरा वर्षाच्या मुलीना नव्वद वर्षाचे श्रीमंत म्हाताऱ्यास रूपयाची थैली घेवून देतात. कोणी सवतीवर मुली देतात, कोणी फार मुली आहेत म्हणून आल्या वरास देतात. मग तो कसा का असेना, तेंव्हा अशा कारणामुळे जर स्त्रिया निघून गेल्या तर तो दोष कोणाचा ? त्या बापाचा का लेकीचा ? [२०]

ताराबाईंचे विवाहाच्या बाबतीतील हे निरीक्षण अतिशय मार्मिकपणे येथे व्यक्त केलेले आहे आणि या लग्नाच्या तऱ्हा अजूनही भारतातील कित्येक भागात दिसून येतात.

ताराबाईनी हा जो लेखन प्रपंच केलेला आहे तो तत्कालीन समाजाचे वास्तवदर्शन घेतलेले आहे. त्यानी स्वत: काही अनुभव अभ्यासिले. त्याचे चिंतन करून त्यानी आपले विचार येथे व्यक्त केलेले आहेत. ज्याला अनुभव आत्मानुभव म्हणतात त्याचे दर्शन येथे घडते. त्यांचा स्वत:चा अनुभव त्या सांगतात, की कांही कित्येक श्रीमंत गृहस्थ आपल्या लेकीचे फक्त लाडाकरिता व आवडीकरिता एखादे गरीबाचे मुलाबरोबर लग्न करून ते जोडपे जवळच बाळगितात. [२१]

ताराबाईंचे लग्न याच पध्दतीने होवून त्यांचे पती घरजावई होते आणि त्यापासून कोणकोणते अनर्थ होतात याचे ही त्या वर्णन करतात. त्या म्हणतात, जोपर्यंत ती उभयंता अज्ञान असमंजस असतात तोपर्यंतच बरे चालते. रोज जे जे धिंडवडे होतात ते ते दृष्टीत पडतातच. तो बापाचा लाड तिला जन्मभर कामी येतो का नाही बरे ? [२२]

ताराबाईंच्या निबंधात केवळ स्वत:चेच अनुभव व्यक्त झालेले नाहीत तर ते आत्मानुतुीची सुध्दा साक्ष आहे. आत्मानुभूति म्हणजे केवळ त्यालाच नव्हे तर सर्व प्राणी मात्राना येणाऱ्या अनुभवाचे जो चिंतन आणि विश्लेषण करतो ती आत्मानुभति (हे मागे पाहिले आहे.) याचाही अनुभव ताराबाईंच्या या निबंधात येतो. ताराबाई तत्कालीन वर्तमानपत्रात गरीब व अबलांच्या दृष्कृत्याबद्दल स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय अत्याचार याबद्दल वाचतात व प्रत्यक्ष तत्कालीन परिस्थितीचा अभ्यास करतात. त्यावेळेस दुसऱ्यांचा अनुभव हा त्यांचा स्वत:चा अनुभव होवून तो सहजपणे उत्स्फुर्तरित्या पण पोटतिडकीने येथे व्यक्त झालेला आहे. त्याची अनेक उदाहरणे या निबंधात दिसून येतात. किंबहुना या निबंधाचा निम्म्याहून अधिक भाग हा असा अनुभूति आणि आत्मानुभूतितून व्यापलेला आहे.

या निबंधाची सुरवातच मुळी एका वर्तमानपत्रातील विजयालक्ष्मी नावाची ब्राह्मण जातीतील विधवा स्त्रीने केलेल्या भ्रुणहत्या व तिला आलेली शिक्षा आणि या एका घटनेने अनेक वृत्तपत्रातून उठलेले वादळ एवढेच कारण निमित्तमात्र झाले आणि ताराबाईंनी हा लेखनप्रपंच केला.

फक्त स्त्रियाकरिता पातिव्रत्य, स्त्रियानीच वैधव्याचे ओझे घेवून जीवन कंठायचे केशवपन, कुंकू पुसणे, सती जाणे, मंगळसूत्र काढणे, हे सारे स्त्रियानीच करावयाचे. स्त्रियांच्या हातून एखादा प्रमाद घडला की त्या व्यभिचारी म्हणाणाऱ्या व त्यांच्या पतिव्रत्याची शंका घेणाऱ्या पुराणाभिमानी पुरूषाना त्या प्रश्न करतात,

"तुमच्या उड्या शास्त्रावर पण येथे शास्त्र पुराण पोथ्या करणारे सुध्दा दांतघशी पडतात कसे म्हणाल, तर शास्त्रकर्त्यांनी ज्या पूर्वयुगात झालेल्या पतिव्रता निवडून काढल्या त्यातून एक दोघी तिघी तर दोषास पात्र असूनही त्यांची तिकडे पहिल्या वर्गातच योजना केली ते कसे बरे." [२३] यासाठी ताराबाई कुंती, सत्यवती व वाली वानराची बायको ताराबाई यांच्या

पुनर्विवाहाची व कुमारीमातांची उदाहरणे देतात. पण हेच जर वास्तवजीवनात घडले तर हा समाज स्त्रियांना दोषी ठरवून त्यांची निंदानालस्ती करण्यास तयार होते. याची ताराबाईंना चीड येते म्हणून त्यांची लेखणी निर्भयपणे चालते.

या निबंधात ताराबाईंचा आत्मानुभव पाहिला तर असे वाटते की, ताराबाई जणू हातात दिवा घेवून समाजात स्त्रियांचे जीवन कसे चालले आहे? स्त्रियांवर कोणते अत्याचार होतात? तत्कालीन सामाजिक रितीरिवाजांचा रूढींचा त्यांच्यावर काय परिणाम होत आहेत ? या साऱ्यांचा अभ्यास करण्यास निघालेल्या होत्या. त्यांनी समाजात चालणाऱ्या घटनांचे अगदी जीवंत दाखले दिलेले आहेत. विधवा स्त्रियांच्या परीस्थितीबद्दल त्या म्हणतात,

"अरे, नवऱ्याआधी बायकोने मरावे किंवा नवऱ्याने बायको आधी मरावे याचा तुमच्या बापदादानी देवापासून काही दाखला आणला काय रे ? मरणे किंवा जगणे हे तर त्या सर्व शक्तिमान नारायणांचे हाती, तुमचे हाती काय दगड आहे ? "[२४]

असे असताना देखिल सर्व दोष स्त्रीयानांच का दिले जातात ? याचा ताराबाईंना मनस्वी राग येतो. मरणे किंवा जगणे हे माणसाच्या हाती नाही. पण पुरूष (नवरा) एकदा मेला की स्त्रीला अनेक प्रकारचे दोष देवून अनेक विशेषण लाविली जातात. याचे निरीक्षण देखिल सूक्ष्मपणे ताराबाईंनी केलेले आहे. पुढे त्या म्हणतात,

" पतिराज एकदा स्वर्गवासी झाले म्हणजे या बाईसाहेबांचे हाल कुत्रे खाणार नाही. तिला कोठे लग्नकार्यात समारंभात जेथे काही सौभाग्यकारक असेल तेथे जाण्याची बंदी. ती बंदी का ? तर तिचा नवरा मेला. ती अभागी करंट्या कपाळाची, तिचे तोंड पाहू नये अपशकून होतो."[२५]

हे सारे पति मेला की तिच्या दोष तिच्या माथी मारतात. याबद्दल ताराबाईना खूप संताप येतो आणि त्या संतापाच्या भरात शास्त्रकर्त्यांना प्रश्न करतात,

"स्त्रियांनी तेवढे हरी देव, देव करीत बसावे. तसे पुरूषानी का बसू नये बरे ? त्यानेच का दुसऱ्याने लग्न करून नांदावे ? स्त्रियांवर त्या शास्त्रकर्त्यांची करडी नजर का ? स्त्रियानी त्या शास्त्रकर्त्यांच्या घरात कधीकाळी आग लाविली होती वाटते." [२६]

समाजरचनेतील पक्षपाताविरूध्द ताराबाईंचे व्यक्तिमत्व इतके पेटून उठलेले पाहिले की हा आक्रोश काहीसा आक्राळविक्राळ राक्षसासारखा वाटतो आणि त्या स्त्रियांच्या कैवारी बनतात. आणि उघड उघड म्हणतात की, "झाशीच्या राणीसारख्या फार नकोत पण एक चार पाचशे स्त्रियाना नि:संग होऊन हातात संगिनी घेऊ द्यात. मग पहा तुमची दुदर्शा कशी उडेल ती. मग चुलीजवळ सुध्दा लपण्यास जागा मिळणे कठीण." [२७] ताराबाईना स्त्रियांनी देखिल आपल्या पूर्वज स्त्रिया जशा शूर होत्या तशाच स्त्रिया अपेक्षित आहेत. तर हा समाजरचनेतील पक्षपातपणा नष्ट होईल यासाठीच त्यांची तडफड सुरू आहे.

अनन्यसाधारणत्व हे निबंधलेखनाचे आणखी एक वैशिष्ठय आहे. अनन्यसाधारणत्वाच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास ताराबाईंची स्त्रीपुरूष तुलना ही कलाकृती खरोखरच एक उत्कृष्ट कलाकृती आहे. निबंधवाङ्.मयाची बरीचशी वैशिष्ठये या निबंधात सामावलेली आहेतच. त्याबरोबरच ताराबाईनी या निबंधलेखनाचे तीन भागात तीन विषयांची मांडणी केलेली आहे.

पहिल्या भागात विधवाना पुनर्विवाहाला बंदी असल्यामुळे स्त्रियांची जी कुचंबणा होते आणि लाखो कोट्यावधी स्त्रिया वैधव्याचे दु:ख कसकसे भोगतात व त्यापासून कसकसे

अनर्थ होतात यामागे पुरूष जातीवर स्त्रीवर कसा अन्याय केला आहे. शास्त्रकर्त्यांचे रीतीरिवाज, रूढीपरंपरा याचा स्त्रियांवर कसकसा परिणाम होतात हे ताराबाईनी तपशिलवार मार्मिकपणे सांगितले आहे.

दुसरा महत्वाचा विषय म्हणजे विवाहीत स्त्रीचे होणारे शोषण होय आणि हे स्पष्ट करीत असताना समाजात रूढ असलेल्या लग्नाच्या तऱ्हादेखील स्पष्टपणे सांगितल्या आहेत. लग्न ठरविण्याचे सर्व अधिकार पुरूषाना, मुलीच्या पसंती नापसंतीचा विचार केला जात नसे. लग्नात पैसा महत्वाचा समजला जाई. मुलगी विधवा झाली तरी चालेल परंतु भरपूर पैसा अडका असेल तर काही हरकत नाही असा विचार केला जाई. विधवा स्त्रीचे केशवपन केले जाई, तिचा देह सर्वांच्या सेवेत झिजवावा अशी अपेक्षा असे हे सारे पाहून ताराबाईंचे मन विषण्ण होते. आणि अतिशय संतापाने तडफडून उठतात आणि पुरूषांच्या दुर्गुणांवर हल्ले चढवितात. या पुस्तकातील निम्म्याहून अधिक भाग लेखिकेने पुरूषांच्या दुर्गुणांची मिमांसा करण्यात व्यापलेला आहे.

१९व्या शतकात जेंव्हा निबंधलेखनाची सुरवात झाली त्यावेळी निबंधलेखनांच्या विषयाचा (शिर्षकांचा) जर विचार केला तर त्या तुलनेने ताराबाईनी एकच निबंध लिहिला आणि आगळया वेगळ्या विषयावर लिहिलेला आहे. हे स्पष्टपणे दिसून येते. चिपळूणकर, आगरकर, टिळक, केळकर, लोकहितवादी यांचे विषय सामाजिक व राजकिय विषयावर आधारीत होते. स्वधर्म देश भाषा याचा प्रचार होता असे दिसते.

ताराबाईनी जो निबंध लिहिला आहे त्याची प्रेरणा त्या विधवा पुनर्विवाहाची चाल बंद झाल्यामुळे किंवा धर्म आणि समाज यांच्या बंधनामुळे तत्कालीन परिस्थितीत विधवा पुनर्विवाहास लोक संमती देत नसत या कारणामुळे विधवा स्त्रियांकडून अनर्थ होत असे आणि

पुढे त्यांची समाजाकडून निंदानालस्ती होत असे. हे जरी खरे असले तरी त्यांच्या निबंधाचे शीर्षक "स्त्रीपुरूष तुलना" असे आहे व त्या शिर्षकाच्या खाली त्यानी स्पष्टपणे असे लिहिले आहे की, "स्त्रिया व पुरूष" यात साहसी कोण आहे हे स्पष्ट करून दाखविण्याकरिता हा निबंध, ताराबाई शिंदे यांनी रचिला. तेंव्हा या निबंधाचा विषयच आगळा वेगळा, ज्याला 'अनन्यसाधारण' म्हणता येईल असा आहे. जो स्थळ कालाच्या बंधनात राहू शकत नाही या विषयांचे संशोधन वर्षानुवर्षे चालले तरी आता या विषयावरील संशोधन संपले असे होणार नाही. यात काही शंका नाही. या निबंधात स्त्री व पुरूष यांची तुलना करता करता अशी काही उदाहरणे दिली आहेत अशी काही रचना केलेली आहे की, ते लेखन आजही ताजेतवाने वाटते. आजच्या परिस्थितीलाही हे लेखन मनाला प्रसन्न करून स्त्रियांचे धैर्य वाढीस लागण्यास उपयुक्त ठरते. छाया दातार या आधुनिक काळातील स्त्री मुक्ती चळवळीतील कार्यकर्त्या लेखिकेनेही आपल्या स्त्रीपुरूष या पुस्तकाच्या परिशिष्टात दिलेल्या संदर्भ ग्रंथसूचीत ताराबाई शिंदे लिखित स्त्रीपुरूष तुलना या निबंधाचा संदर्भ दिला आहे. स्त्री पुरूष तुलनामधील एक-दोन उदाहरणे पाहू –

"अरे नवऱ्याआधी बायकोने मरावे किंवा नवऱ्याने बायकोआधी मरावे याचा तुमच्या बाबदादानी देवापासून काही दाखला आणला काय रे ? जगणे किंवा मरणे हे तर सर्व शक्तीमान नारायणाचे हाती. तुमचे हाती काय दगड आहे ? ...... त्याला स्त्रियांनी काय करावे ? मागे कधीकाळी कोणी तरी एखादी स्त्री आपले नष्ट झालेले अगर यमाने नेलेले सौभाग्य परत मागण्यास ब्रह्मदेवाजवळ गेली होती. तेंव्हा तिला त्या सृष्टी निर्मित्या भगवंतानी "कोणत्याही स्त्रियेस पुन्हा सौभाग्य तिचे हयातीत मिळणार नाही" असा काही दाखला तरी दिलेला. तुमच्या भारतात सांपडतो काय ? एक सावित्री वेगळी करून तर यमामागे सौभाग्य

दानाकरिता कोणीच गेली नाही. बरे ती गेली तशी पतीचे प्राण घेवून आली. या स्त्रीजातीत सावित्री तरी आपल्या पतीचा प्राण परत आणण्याकरिता यम दरबारात जाऊन आली. पणा पुरूषामध्ये कोणी तरी आपले बायकोचे प्राणाकरिता यमराजाचे दरबारात तर नाहीच. पण उगीच त्या दरबाराचे वाटेवर तरी गेलेला कोठे ऐकण्यात आला आहे काय ? तर जसे एकदा सौभाग्य गेले म्हणजे स्त्रियानी आपली तोंडे अगदी एखाद्या महान खुन्यापेक्षाही महाजबर अपराध्याप्रमाणे काळी करून सर्व आयुष्यभर अंधार कोठडीत रहावे त्याप्रमाणे तुमच्या बायका मेल्या म्हणजे तुम्ही ही आपले तोंड काळे करून दाढ्या मिशा भादरून याव्यात. एक बायको मेली की तिचे दहावे दिवशीच तुम्ही दुसरी बायको करून आणावी असा तुम्हाला कोणत्या शहाण्या देवाने दाखला दिला आहे. दाखवा बरे जशी स्त्री तसेच पुरूष. [२८]

अशाप्रकारची अनेक उदाहरणे दाखले ताराबाईनी संपूर्ण निबंधात दिलेली आहेत. ताराबाईनी येथे स्त्रीपुरूष समानतेचा विचार मांडलेला आहे. त्यांचे विचार पाहिले तर असे वाटते की, स्त्रियांची स्थिती सुधारायची तर प्रथम ह्या पुरूषवर्चस्वाच्या भावनेचा बीमोड व्हायला हवा. हे इतक्या स्पष्टपणे तत्कालीन कोणत्याही सुधारकाने जाणलेले दिसत नाही. व ते करण्याचा प्रभावी प्रयत्नही दिसून येत नाही.

## ३.११ स्त्री-पुरूष समानता :

लोकशिक्षण व लोकजागृती हा देखिल तत्कालीन निबंधवाङ्.मयाचे एक वैशिष्ठय आहे. स्वधर्म स्वभाषा स्वराष्ट्र याबद्दल लोकामध्ये जागृती करणे समाजातील अनिष्ट रूढींचे उच्चाटन करणे व सकळ समाजस शहाणे करून सोडावे. यासाठी वृत्तपत्रे नियतकालीकांचा तसेच साहित्याचा लोशिक्षणाचे माध्यम म्हणून उपयोग करीत असत. पण ताराबाईचा "स्त्रीपुरूष तुलना" हा निबंध लोकशिक्षण व लोकजागृती यासारख्या वैशिष्टयामध्ये बसत

नाही. त्यांचा विषय सर्वस्वी वेगळा आहे. त्याना स्त्री व पुरूष यामध्ये साहसी कोण आहेत हे व स्त्रीपुरूष समान आहेत हे दाखववावयाचे आहे. नाही म्हणता हा निबंध उपदेश या वैशिष्टयात थोडाफार बसतो. कारण पुनर्विवाह करणे त्यापासून स्त्रियांच्या हातून होणारे अनर्थ कसे थांबविता येतील याचे विश्लेषण करता करता स्त्री व पुरूष एकाच संसाररूपी रथाची दोन चाके आहेत. तेंव्हा दोघानाही समान अधिकार प्राप्त झाले पाहिजेत हा त्यांचा आग्रह येथे दिसून येतो. येथे स्त्रियांच्या स्वभावात जो भोळेपणा आहे तो नष्ट झाला पाहिजेत असे त्यांचे विचार आहेत. येथे स्त्रियांचे अज्ञान नष्ट होणे आवश्यक आहे याचाही विचार त्यानी व्यक्त केला आहे. स्त्रीजागृती म्हणून कदाचित या निबंधाचा उल्लेख केल्यास काही चूक होईल असे वाटत नाही. ताराबाई लिहितात झाशीच्या राणीसारख्या फार नकोत पण एक चार पाचशे स्त्रियाना निस्संग होवून अशाप्रकारे स्त्रियातील आत्मसामर्त्य जागृत झाले तर त्या पुरूषाचा जुलूमाच्या जोखडाखाली कधीच राहणार नाहीत. हा स्त्रीवादी विचार ताराबाई मांडताना दिसतात.

भाषाशैली आणि व्यक्तिमत्वाची छाप हा ही निबंध वाङ्.मयाचा एक गुण आहे. याची प्रचिती तर ताराबाईंच्या स्त्रीपुरूष तुलना या निबंधात पदोपदी येते. तसे पाहता ताराबाई एका खानदान मराठा घराण्यात जन्माला आल्या. घोषापध्दती देखिल त्यानी अवलंबिली असेल. समाजात मिसळणे थोडे कमीच तरी देखिल त्याना शिक्षण मात्र उत्तमप्रकारे मिळालेले होते. त्यांचे ज्ञान सखोल होते. त्यांचे वाचन भरपूर होते. त्या बहुश्रृत होत्या हे त्यांच्या निबंधाच्या शैलीची धार पाहिली की वाचकास अंदाज येतो. संपादक विलास खोले लिहितात,

"ताराबाई शिंदे यांचे "स्त्रीपुरूष तुलना" हे मराठीतील असे पहिले लेखन आहेत की ज्यात एक स्त्री केवळ धीटपणेच नव्हे तर सुसंगतपणे तर्कशुध्द रीतीने परखड शब्दात, स्त्रीपुरूष नात्यासंबंधी व तिच्या अखंड शोषणासंबंधी पुरूषाना सरळसरळ प्रश्न विचारते आहे."[२९] ताराबाईंच्या निबंधाचा अविष्कार क्रांतीकारक स्वरूपाचा आहे. तसेच स्त्री जीवनाशी संबंधित असलेली अस्सल उपमान सृष्टीही त्या आपल्या मदतीला घेतल्या. उदा. दिवा, पाळणा, विस्तव, शेगडी, दूध, ताक, शेवया, मिरे, कापूस, ढेकून, पिसवा तसेच जुवा, बाजिंदी, मुकाबला, अमीर यासारखे हिन्दी अरबी फारशी शब्दही दिसतात. उत्तम वाक्यप्रचार ही दिसून येतात. उदा. घोडा डेरता बाप, मरावा पण राहटाने सूत कातणारी आई मरू नये, शालजोडीला रकट्याचे ढिगळ, आगीचा लोळ त्यावर तेल, रजाचा गज, वाघाला जशी बकरी, कसाबाच्या हाती गाय तसेच काही म्हणी देखील ताराबाईंच्या लेखनाला एक प्रभावी वळण लावून जातात. उदा.

१) एक मशाल दहा दिवटे

२) पारखा पाय घराला अपाय

३) ज्यांचे हाती ससा तो पारधी बाकी सारे गौदी

४) श्रीमंत असले म्हणजे अमीर भिकारी हुये तो फकिर बरे आता मेल्यावर तर पीर

५) हागवणी बायको नागवणी सोयरा

६) नाऱ्याने केले कशाला प्रायश्चित इ.

अशाप्रकारे उपरोधगर्भ वाक्यप्रचार आणि म्हणींचा उपयोग करीत असताना बोली भाषेशी अतूट नाते सांगणारी ताराबाईंची शैली प्रसंगी अश्लीलता टाळण्यासाठी गरजेनुसार संस्क्रतप्रचुरे बनते. उदा.

१) त्या चिरेबंदी कोटात ह्या वाघरूपी कामांध मद्यप्राशनाने धुंद व मांसाहाराने तुंद झालेल्या बोकडास.

२) ह्दय पुष्प वाटिकेतील मधुर केतकीच ईश्वरी कृपाप्रसादाने लावलेली डाळिंबीच.

३) तेंव्हा मातेच्या सुवर्ण कुचकमंडलूतले अमृतास ओठदेखिल लावीत नाहीत.

४) कुसुमचा पास कोणत्या रितीने आवरून धरावे ?

५) मन गच्च विवेकाचे खांबास गच्च बांधा.

६) तुम्ही आपले मदोन्मत्त कामकाज कर्दळा वनात सोडून पायाखाली तुडवू नका.

याशिवाय गंगाजळासारखे निर्मळ, अमृतवल्लीसारखे गोड अग्निसारखे किंवा सूर्यासारखे सतेज यासारख्या उपमांचाही उपयोग समर्पकपणे केलेला आढळतो.

ताराबाई केवळ बहुश्रुतच नव्हत्या तर त्यांचे वाचन चौफेर होते हे त्यांनी या निबंधात दिलेल्या दाखल्यावरून दिसून येते.

विजयालक्ष्मी खटल्याचे पडसाद पुणेवैभवकरांचा सनातनीपणा हे वृत्तपत्रीय उल्लेख सार्वजनिक सभेच्या कार्यासंबंधी शेरे मंजूघोषा, मनोरमा नाटक समकालीन ललित लेखनाचा घेतलेला समाचार (पृ.२८-३१), आनंदीबाई (पृ. ३१), झाशीची राणी (पृ. ९) ऐतिहासिक स्त्रियांचे उल्लेख लव्ह बिगेटस् लव्ह या इंग्रजी म्हणीचे ममतेने ममता वाढते हे प्रासादिक भाषांतर (पृ.११).

मांजराच्या गळ्यात घंटा बांधण्याच्या उंदराच्या सभेची नीती कथा (पृ.६), आंधळ्या मातेसमोर बढाई मारणाऱ्या मुलांची कथा, बिरबल बादशहाची कथा. (पृ.क्र. ६) या उल्लेखावरून ताराबाईंच्या चौरस वाचनाची चांगलीच कल्पना येते.

पौराणिक दाखले तर त्यांच्या लेखनात पदोपदी दिसून येतात. रामविजय, हरिविजय, पांडवप्रताप जेमिनी अश्वमेध या ग्रंथातले अनेक दाखले त्यानी दिलेले आहेत. रामायणातील सीता व तारा यांच्या पतिव्रतेची उदाहरणे, तर महाभारतातील द्रौपदी, कुंती यांच्या चारित्र्यावर आक्षेप घेणारी उदाहरणे दिलेली आहेत. पौराणिक दाखल्याचे त्यांचे निवेदन पुष्कळदा थट्टेखोर ढंगानेही झालेले आहे. देवाची एकूण पक्षपाती वागणूक पाहून बाई तळमळून म्हणतात, अरे तुम्ही देव नां ? तुमचेजवळ मुक्तद्वार पक्षपात नाही ना ? मग हे रे काय रे ! पक्षपाताचा बाप झाला ना हा ! "अरे पुरूषाना तशीच स्त्रियांना तूच निर्माण केलेस ना ! मग त्यांना सुख आणि याना दुःख अशी निवडानिवड का रे केलीस ?" [३०] "बाबा तू तर करून चुकलास पण त्याना सोसणे भाग झाले रे झाले." ताराबाईंचे हे स्पष्ट लेखन पाहिले की असे वाटते जणु कांही त्या देवासमोर उभे राहून प्रत्यक्षात त्यांच्याशी भांडत आहेत आणि स्त्री व पुरूष यातील पक्षपातीपणाबद्दल देवाला जाब विचारत आहोत. पुरूषाना देखील त्या अशाप्रकारे "अरे ... अरे ... " हे प्रत्यय लावूनच प्रश्न विचारतात. त्या शब्दामागे ताराबाईच्या मनात असलेली पुरूषाच्या दोषाबद्दल स्वभावाबद्दलचा तीव्र संताप दिसून येतो आणि स्त्रियांना न्याय मिळवून देणाऱ्या स्त्रियांची जणू काही ताराबाई वकील आहेत की काय असा भास होवू लागतो.

मात्र, 'अरे' हा शब्द ताराबाईंनी उपहासाने वारंवार वापरलेला आहे. स्त्रियांचा मूलतः भोळा, कोणत्याही गोष्टीवर चटकन विश्वास ठेवून नंतर फसतात तो भाग वेगळा निरंतर स्वतःपेक्षा घरातील इतर मंडळींची सेवा करण्यात आपले आयुष्य वेचणाऱ्या, असे असता पुरूष हे चतुर कोल्हे पुन्हा स्त्रियांनाच दोष देतात व छळतात. म्हणून स्त्रीवर होणाऱ्या अन्यायामुळे व्यथित होणारा त्यांचा स्वर स्त्री प्रेमाचे कौतुक करताना कोमल व हळवा होतो.

"स्त्रियांची प्रिती केवळ समुद्रासारखी खोल आहे. ती ज्यावर फिदा होईल त्याला प्राणापलीकडे ठेविल. तिचा किती जरी वनवास केला तरी ती त्याचाच ध्यास धरिल. स्त्रियांचे ह्दय अति कोमल प्रीतीने भरलेले आहे."[३१] आणि या तुलनेने पाहता पुरूषांची वृत्ती चंचल असते. लोभी, मत्सरी असते हे त्यानी बहुतेक जवळून पाहिले असेल त्याचे प्रतिबिंब लेखनात दिसते.

ताराबाईचे वाचन केवळ पोथ्यापुराणे किंवा समकालीन वृत्तपत्रे यांच्यापुरतेच मर्यादित नव्हते. तत्कालीन लोकप्रिय कथाकादंबऱ्याही त्यानी डोळसपणे वाचल्या होत्या याचाही प्रत्यय त्यानी दिलेल्या उदहारणावरून येतो. मुक्तामाला आणि मंजूघोषा या कांदबऱ्यावरील त्याची टीकाही ललित सीहित्यातून वास्तव चित्रणाची अपेक्षा करणारी आहे. मुक्तामाला कादंबरीबाबत "अशा गोष्टी लिहिणे म्हणजे काय ?" की एखाद्या लहान मुलाला समजाविणे आहे. नित्य क्रमांवरून हे किती खोटे आहे ते सहज लक्षात येते. असे त्या लिहितात. [३२] म्हणजे येथे लेखनातील अवास्ततेबरोबर ग्रंथकर्त्यांच्या बालीश समजुतीचेही दिग्दर्शन त्या करतात. मनोरमा नाटकासंबंधी लिहिताना ताराबाईनी औचित्य विवेकाचा प्रश्न उपस्थित केला आहे. त्या म्हणतात, "सगळ्यांच्याच घरी कोणाची बहीण, आई सून लेक विधवा असलेच की नाही ? तर एकीला बट्टा लागला म्हणजे सरसकट सगळ्याच त्यात आल्या की नाही ? तेंव्हा यात काय सार्थक झाले ! "[३३] असा औचित्याचा प्रश्न त्याना विचारावासा वाटला आहे. दु:स्थितीकथनाच्या निमित्तानेदेखिल स्त्रीजातीच्या विपरित वर्तनाचे प्रदर्शन घडू नये. अशी सहवेदना ताराबाईंच्या भाष्यातून ध्वनित होते.

ताराबाईंच्या लेखनात स्त्रीजातीच्या असहायतेविषयी अपार करूणा आहे. आणि पुरूषी आरेरावी विषयी कमालीची घृणा आहे. त्यामुळे येथे कधी कधी शब्दांचे जळजळीत अंगार उसळताना दिसतात. तर कित्येकदा उपहास उपरोधाचे फटकारे झडताना आढळतात.

पुरूषानी चालविलेले साहेबांचे आचरट अनुकरण म्हाताऱ्यां नवरदेवाचा तरूण दिसण्याचा आटापिटा, भोंदू, बुवांची ठकबाजी, तसेच कलमबहाद्दर भाकरीबहाद्दर, पुंडलिकाचे पाय चेपणे व आजचे पाय मोडणे असा कौटिबाजपणाही मधून डोकावतो. तरी देखील ताराबाईंच्या भाषाशैलीचे प्रमुख वैशिष्ठय म्हणजे मनस्वी चीड व त्यातून आलेला आक्रमकपणा हेच आहे.

ताराबाईची लेखणी स्पष्टपणे, बेधडक निसंकोचपणे बेपर्वाईने कोणत्याही गोष्टीचा आडपडदा न ठेवता चालते हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचाच एक भाग होय. येथे ताराबाई स्त्रीच्या नैसर्गिक कामना अमानुषपणे रूढीच्या दाबाखाली दडपून टाकू पाहणाऱ्या पुरूषाना तर्कशुध्द सवाल केला आहे.

" पुरूषविरहित स्त्रियास तरी कसे सुख होईल बरे ? जी तुमची दशा तीच तिची ! तिलाही किती मोठ्या ऐश्वर्यात एकटी ठेवा म्हणजे पहा तिची कशी दशा होते ती ! "[३४]

शेवटी ताराबाई वैवाहिक नात्यात समानतेची अपेक्षा गृहीत धरतात. स्त्री व पुरूष या दोन्ही चाकांची गरज संसाररूपी गाढा ओढण्यास आवश्यक आहे असा विचार मांडताना दितसात. "स्त्री ही अर्धांगी शक्ती आहे." "तुमचे काम एकच, गाडा तुम्ही भरावा", पुढे तो हाकून त्याची सर्व व्यवस्था लावणे तिच्याकडे.[३५] ताराबाईंचे "स्त्रीपुरूष तुलना" हे पुस्तक पुरूषाना आत्मपरिक्षणास उद्युक्त करतात. आणि सदाचाराने वागण्याचा उपदेश करतात. स्त्री पुरूष मिळून समाधानाने संसाराचा गाडा चालविला पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करतात. आणि जगनियंत्या परमेश्वराची प्रार्थना करतात की "यांचे कल्याण होण्याकरिता मनापासून करून हा निबंध संपविते."[३६]

खरोखरंच ताराबाईना एक स्त्री म्हणून इतर स्त्रियांच्या जीवनाबद्दल किती कळवळा होता, प्रेम होते, आदर होता हे तर दिसून येतेच पण स्त्रियांच्या जीवनात सुखसमाधान स्थापन व्हावे म्हणून शेवटी पुन्हा देवाची करूणा भाकतात यात त्यांच्या भव्य व्यक्तिमत्वाचे विशाल मनाचे प्रतिबिंब दिसून येते.

ताराबाईंच्या लेखनाबद्दल लेखिका मृणालिनी जोगळेकर लिहितात, जे सामर्थ्य लेखणीचे तसेच कसब बहुश्रृतपणात दिसते. पुरूष वर्गाच्या नाना व्यवहारातील व नाना व्यवसायातील वेगवेगळया लबाड्या भ्रष्टाचार ताराबाईनी इतक्या बारकाव्याने टिपला आहे की त्यांच्या सूक्ष्म निरिक्षण शक्तीने वाचकाने चकितच व्हावे इतका व्यापक अनुभव त्यानी कसा मिळविला असेल असा प्रश्न मनात तरळल्याशिवाय राहत नाही. आणखी एका गोष्टीचे नवल वाटते, ते म्हणजे स्त्री जात म्हणजे वाईट, क्षुद्र, मत्सरी, मूर्ख, अबला पुरूषांच्या तुलनेने तुच्छ इ. गैरसमजुती त्याकाळी पुरूषांच्याच मनात होते असे नाही तर स्वतः स्त्रियांच्या मनातही हे समज सततच्या संस्कारामुळे व शिक्षणाच्या अभावामुळे घट्ट बसले होते. हे खोटे असावेत, खरंच आपण क्षूद्र अहोत का ? अशा शंका कुणाही स्त्रीच्या मनात येत नव्हत्या. निदान त्या व्यक्त झालेल्या आढळत नाहीत. मग युक्तीवादाने त्या खोडून टाकणे तर दूरच. तसे करण्यासाठी आवश्यक ते जगाचे ज्ञान मनुष्य स्वभावाचे व्यापक निरिक्षण जगरहाटीची माहिती तर्कशक्ती सामान्य स्त्रियात विकसित झाली नव्हती. अशा काळात ताराबाईसारखी ब्राम्हणेतर समाजातील स्त्री हे सामर्थ्य मिळवून तर्कशुध्दपणे व परखडपणे स्त्रियांची बाजू निबंधरूपाने मांडते हेच विशेष वाटते.[३७]

संपादक विलास खोले लिहितात, "इतिहासाने स्त्रियाकडे नेहमीच दुर्लक्ष केले. कारण त्या पुरूषांना प्राधान्य होते. अशाच गोष्टी पारंपारिक इतिहासाचा विषय होत्या.

राजेराजवाडे, सरदारदरकार, जहागिरदार इनामदार व त्यांचे कार्यकर्तृत्व हेच इतिहासाचे केंद्र होते. इतिहास लेखनाची आजवरची पध्दती वरून खाली येण्याची अशी होती. तळाकडून वर जाण्याच्या इतिहासलेखनाच्या पध्दतीला अलिकडे आरंभ झाला होता. यादृष्टीने पाहता ताराबाई एकोणिसाव्या शतकातील स्त्रियांच्या स्थितीचे अवलोकन करतात. त्यांची तशी स्थिती का झाली याची चिकित्सा करतात. ती मागील पुरूषांच्या राजकारणाची निर्भर्त्सना करतात आणि स्त्रियांच्या दैनंदिन जीवनात त्याना स्वतःचे स्थान कसे प्राप्त होईल याची विवंचना करतात हे कौतुकास्पद होय." [३७]

डॉ. सं. ग. मालशे लिहितात, "ताराबाईंच्या काळी स्त्री शिक्षणाचा प्रसार तो कितीसा असणार ? त्यातही एखाद्या स्त्रीने चर्चात्मक स्वतंत्र पुस्तक लिहावे ही गोष्ट अपवादभूतच पांढरपेशा समाजातील स्त्रिया लिहू लागल्या त्या एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी व विसाव्या शतकाच्या प्रथमपादात हरिभाऊ आपट्यांच्या करमणुकीत व मिश्रांच्या मनोरंजनात उत्तेजन मिळू लागल्यावर तत्पूरवी मिसेस फरारसारखी किंवा पंडिता रमाबाईसारखी एखादी मिशनरीबाई असे लेखन करताना आढळते. कोणी हिन्दू पांढरपेशाबाईने लिहिलेच तर बहुधा पौराणिक गोष्टी किंवा गाणी अशा स्वरूपाचेच असावयाचे. अशा काळात एका मराठाबाईने हे पुस्तक लिहिले आहे. तेही धार्मिक व पौराणिक स्वरूपाचे नव्हे तर सामाजिक ज्वलंत प्रश्नासंबंधीचे आहे. स्त्री पुरूष तुलनेसारख्या प्रश्नावर ताराबाई शिंदे या मराठा बाईने १८८२ साली एक दीर्घ निबंध लिहावा ही खरोखरंच नवलाईचीच गोष्ट म्हटली पाहिजे." [३९]

"डॉ. नागनाथ कोत्तापल्ले : स्त्री पुरूष तुलना वाचताना लक्षात येते ते असे की ताराबाई त्या काळाच्या तुलनेत खूपच वाचन करणाऱ्या विचार करणाऱ्या असाव्यात. त्याना संस्कृत व मराठी साहित्य वाचनाची आवड असावी असे त्यांच्या लेखनावरून दिसते.

आणि त्या केवळ वाचतच नव्हत्या तर त्यावर बारकाईने विचारही करीत होत्या असेदिसते आणि आपले विचार सुसंगतपणे मांडण्याची कुवतही त्यांच्यामध्ये होती असे जाणवते. याचा आवर्जून निर्देश यासाठी करावयाचा की १८८५ पूर्वी मराठीमध्ये लिहिणाऱ्या स्त्रिया जवळ जवळ नाहीतच म्हटले तरी चालेल. पंडित रमाबाईंचा अपवाद सोडला तर इतर कुणी स्त्री बौध्दिक चमक दाखविणारी दिसत नाही. पंडिता रमाबाई ख्रिश्चन झाल्या होत्या आणि फरेबाई तर खूदख्रिश्चन होत्या. इंग्लंडवरून आलेल्या त्या लिहित असत नाही असे नाही. परंतु महाराष्ट्रीयन स्त्री आणि त्यातही ज्या वर्गाला शिक्षणाची संधी फारशी मिळत नाही अशा वर्गातली स्त्री लेखन करते, तेजस्वी स्फुलिंगासारखे लेखन करते ही दुर्मिळ बाब आहे."[४०]

अशाप्रकारे ताराबाईंच्या स्त्रीपुरूष तुलना या निबंधाचा निबंध वाङ्.मयाच्या गुणधर्म व वैशिष्ठ यांच्या दृष्टीकोनातून अभ्यास केला असता बहुतेक सर्व निबंध वाङ्.मयाच्या वैशिष्ठयानुसार हा निबंध आहे. परंतु १९व्या शतकातील निबंधवाङ्.मयाचे वैशिष्ठय ज्याला मुख्य प्रयोजन म्हणावे ते म्हणजे लोकशिक्षण व लोकजागृती येथे कांही अंशी मागे पडतो. तसेच संपादक विलास खोले यांच्यामते ही, "शृंगार हास्य व करूण या रसाना ललित साहित्यात असणारे स्थान त्यानी ओळखले होते. तरीही साहित्यव्यापारातील बहिस्तरावरील संकेतांचा सरधोपट स्वीकार न करता स्वतंत्रपणे विचार करून आपला टीकाविवेक मांडण्याची ताकद त्यांच्या लेखणीत आहे."[४१]

याचाच अर्थ येथे शृंगार हास्य व करूण रसांचा अभाव असूनही ताराबाईंचे लेखन प्रभावी झालेले आहे. स्थलकालाच्या बंधनाच्या सिमेपलीकडे जावून ही आकृती अक्षर आवृती झालेली आहे. यात काही शंका नाही. याबाबतीत मृणालिनी जोगळेकर लिहितात, तत्कालीन समाजाने ताराबाईना उपेक्षिले तरीपण आज आपल्याला मोकळेपणाने

कबूल करावेसे वाटते की, आजच्या स्त्रीमुक्ती चळवळीतील कितीतरी मागण्यांची "पूर्व साद" ताराबाईंच्या ह्या छोट्या निबंधातून ऐकू येते. ह्या छोटया निबंधातून तत्कालीन सर्वसामान्य स्त्रियापेक्षाच नव्हे तर तत्कालीन सुशिक्षित उच्चवर्णिय स्त्रियापेक्षाही ही स्त्री किती वेगळी होती व किती पुढच्या काळाशी नाते जोडत होती हे लक्षात येते. [४२]

## ३.१२ ताराबाई व जोतीराव फुले यांच्या शैलीतील साम्य :

ताराबाई शिंदे यांच्या शैलीबाबत संपादक विलास खोले म्हणतात, जोतीराव फुले व ताराबाई यांच्या लेखनाची तुलना केली असता त्या दोघात फार मोठे विचार साम्य आढळते. देव आणि ऋषी यांच्यावर जशी ताराबाईनी टीकेची झोंड उठविली आहे किंबहुना रूढ पारंपरिक समजूती दूर सारून फुल्यानी देव व ऋषी आणि धर्म यासंबंधी क्रांतीकारक विचार मांडून वैचारिक उलथापालथ घडवून आणली. [४३]

डॉ. सं.ग. मालशे - नव्या सुधारणाबद्दल इंग्रजाना दुवा देणे व न्यायदानाच्या बाबतीत त्यांच्यावर ठपका ठेवणे याही बाबतीत ताराबाईंचा दृष्टीकोन, फुल्यांच्या दृष्टीकोनाशी नेमका जुळतो. दोघांची भाषाशैली एकरूपच वाटते इतकी की एक झाकावी व दुसरी काढावी. [४४]

ताराबाईंचा हा निबंध वाचत असताना त्यांची समर्थ व परखड शैली सतत जाणवत राहते. तिच्यातून त्यांचे प्रगल्भ व ताठर व्यक्तिमत्व डोकावते त्यामुळे या शैलीला एक भारदस्त डौल प्राप्त झालेला आहे. हे दिसून येते.

## ३.१३ समारोप :

प्रस्तुत प्रकरणात ताराबाई शिंदे लिखित स्त्रीपुरूष तुलना निबंधाची वाड्.मयीन वैशिष्ठये या संदर्भात अभ्यास केलेला आहे.

निबंध हा वाङ्.मयप्रकार १९व्या शतकात जन्माला आला. लोकहितवादी चिपळूणकर, टिळक, आगरकर, कृ.प. खाडिलकर, अच्युत कोल्हटकर यासारख्या अलौकीक व्यक्तिमत्वाच्या महापुरूषानी घडविला. या निबंधवाङ्.मयाची वैशिष्ठये मुद्दाम म्हणून ठरविली गेली नसावीत. पण एकूणच त्या काळातील निबंधाचे वाचन कले असता तसेच निबंध वाङ्.मय या वाङ्.मयप्रकारावर ज्या ज्या लेखकानी अभ्यास केलेला आहे त्याचा अभ्यास केल्यास या निबंध वाङ्.मय प्रकाराची काही वैशिष्ठये दिसून येतात. यासाठी डॉ. मनोहर अळतेकर यांचे मराठी निबंध, तसेच डॉ. अ.ना. देशपांडे यांचा आधुनिक मराठी वाङ्.मयाचा इतिहास भाग-१ या पुस्तकांचा अभ्यास करून निबंध वाङ्.मयाची वैशिष्ठयांचा अभ्यास करण्यात आला.

अशा प्रकारे निबंधाची वाङ्.मयीन वैशिष्ठये साधारणपणे १८७४ ते १९२० पर्यंतच्या कालखंडात सारखीच दिसून येतात.

ताराबाईंच्या "स्त्रीपुरूषतुलना" या निबंधाचा वाङ्.मयीन गुणवत्ता यादृष्टीने अभ्यास करून पाहिले असता बऱ्याच अंशी या निबंध वाङ्.मय प्रकाराच्या वैशिष्ठयामध्ये हा निबंध बसतो. डॉ. स.ग. मालशे, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले संपादक विलास खोले, मृणालिनी जोगळेकर यांनी या निबंधाला पुस्तक असे संबोधिलेले आहे. पण खुद्द ताराबाई शिंदेनी मुखपृष्ठावरच "स्त्रीपुरूषतुलना" या शिर्षकाबरोबरच स्त्री व पुरूष यात साहसी कोण हे स्पष्ट करून दाखविण्याकरिता हा निबंध असा उल्लेख केलेला आहे. आणि निबंधवाङ्.मयाच्या वैशिष्ठयानुसार या निबंधाचा अभ्यास केला असता हा निबंध योग्यही वाटतो. ताराबाईंच्या व्यक्तिमत्वाची छाप त्यांच्या करारीपणाची कडकपणाची रागीटपणाची छाप अनेक ठिकाणी त्यांच्या शैलीतून अवतरलेली दिसून येते.

पुरूष हे दुर्गुणांचे पुतळे असतानाही प्रत्येक चूकीचे मागे दोष मात्र स्त्रियांना दिले जातात याची त्यांना खूप चीड येते आणि संतापाच्या भरात पुरूषाबरोबर देवाना देखिल सडेतोडपणे निर्भयपणे प्रश्न करतात आणि शास्त्र, पुराण, पोथ्या नुसती पुरूषानुकूल आहेत असे नाहीत तर ती सरळ सरळ स्त्री विरोधी आहेत असा त्यांचा आरोप आहे. स्त्रियांच्या प्रगतीला आळा घालणारी, अडथळे निर्माण करणारी पुरूषप्रधान संस्कृती रूढी, परंपरा यामध्ये काहीही अर्थ नाही हे सिध्द करून देताना ताराबाई रामायण महाभारत पुराणातील कथा तसेच तत्कालीन साहित्यकृतींची उदाहरणे देतात.

प्रसंगी त्यांचा स्वर कोमल ही होतो, प्रसंगी तोच स्वर आक्राळविक्राळ रूप धारण करतो. तर कधी हाच सूर पुरूषाप्रमाणे स्त्रियांनाही समान दर्जा प्राप्त करून द्या म्हणून अधिकारही गाजवतो.

निबंधवाङ्.मय म्हणून स्त्रीपुरूषतुलना निबंध लोकशिक्षण लोकजागृती आणि शृंगार व रस सोडल्यास हा निबंध शंभर वर्षापूर्वी लिहिलेला असूनही आज २१व्या शतकाकडे वाटचाल करीत असता प्रत्येक स्त्रिचे धैर्य वाढीस लावणारा विशेष करून ज्या स्त्रियांना व्यभिचारी कुलटा म्हणून हिणविले जाते, तसेच विधवा स्त्रियांचे मनोबल वाढविणारा निबंध आहे, असे वाटते.

****

## संदर्भ ग्रंथ


१) शिंदे ताराबाई - "स्त्रीपुरूष तुलना" , संपादक विलास खोले, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९७., प्र.आ.प्रस्तावना, पृ.क्र. १३, १४.

२) तत्रैव, मुखपृष्ठ.

३) डॉ. आळतेकर मनोहर, "मराठी निबंध", सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, १९६३, प्र.आ. पृ.क्र. ३०.

४) डॉ. आळतेकर मनोहर, "मराठी निबंध", सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, १९६३, संपादक नवभारत ग्रंथमाला, पृ.क्र. ६, ७.

५) डॉ. अ.ना. देशपांडे, "आधुनिक मराठी वाड्.मयाचा इतिहास भाग-१", व्हीनस प्रकाशन, पुणे, कालखंड १८७४-१९२०, प्र.आ. १९५८, पृ.क्र. ४७१.

६) डॉ. आळतेकर मनोहर, "मराठी निबंध", सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, १९६१, पृ.क्र. २९.

७) डॉ. आळतेकर मनोहर, "मराठी निबंध", सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, १९६२, प्र.आ. पृ.क्र. ५३, ५५, ५६.

८) तत्रैव, पृ. क्र. ५१.

९) तत्रैव, पृ. क्र. ५८.

१०) डॉ. अ.ना. देशपांडे, "आधुनिक वाड्.मयाचा इतिहास भाग-२", व्हीनस प्रकाशन, पुणे, पृ.क्र. ६९०.

११) शिंदे ताराबाई, "स्त्रीपुरूष तुलना ", १८८२, संपादक विलास खोले, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९७, प्र.आ. पृ.क्र. १.

१२) तत्रैव, पृ. क्र. ३, ४.

१३) तत्रैव, पृ. क्र. ४.

१४) तत्रैव, पृ. क्र. ७.

१५) तत्रैव, पृ. क्र. १.

१६) तत्रैव, पृ. क्र. ७.

१७) तत्रैव, पृ. क्र. ११.

१८) तत्रैव, पृ. क्र. ४३.

१९) तत्रैव, पृ. क्र. ५१.

२०) तत्रैव, पृ. क्र. २, ३.

२१) तत्रैव, पृ. क्र. २६, २७.

२२) तत्रैव, पृ. क्र. २९, ३०.

२३) तत्रैव, पृ. क्र. ३०.

२४) तत्रैव, पृ. क्र. ३, ४.

२५) तत्रैव, पृ. क्र. १०.

२६) तत्रैव, पृ. क्र. १२.

२७) तत्रैव, पृ. क्र. १२.

२८) शिंदे ताराबाई, "स्त्रीपुरूष तुलना", १८८२, संपादक विलास खोले, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९७, प्र.आ. पृ.क्र. ११, १३.

२९) तत्रैव, पृ. क्र. ११.

३०) तत्रैव, प्रस्तावना, पृ. क्र. ५३.

३१) शिंदे ताराबाई, "स्त्रीपुरूष तुलना", संपादक डॉ. सं.ग. मालशे, मराठी विभाग प्रमुख, मुंबई, प्र.आ. मुंबई, १९७५, पृ.क्र. १६.

३२) शिंदे ताराबाई, "स्त्रीपुरूष तुलना", १८८२, संपादक विलास खोले, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९७, प्र.आ. पृ.क्र. ४३.

३३) तत्रैव, प्रस्तावना, पृ. क्र. ४०.

३४) तत्रैव, प्रस्तावना, पृ. क्र. ४१.

३५) तत्रैव, प्रस्तावना, पृ. क्र. ८.

३६) तत्रैव, प्रस्तावना, पृ. क्र. ४८.

३७) तत्रैव, प्रस्तावना, पृ. क्र. ४९.

३८) "स्त्री अस्मितेचा अविष्कार एकोणिसावे शतक भाग-३", ताराबाई शिंदे व जनाक्का शिंदे, पॉप्युलर प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९९३, पृ.क्र. ३९, ४०.

३९) संपादक विलास खोले, ताराबाई शिंदे लिखित स्त्री पुरूष तुलना, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९९७, प्रस्तावना, पृ.क्र. ५५, ५६.

४०) संपादक डॉ. स.ग. मालशे, स्त्री पुरूष तुलना, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई, प्र.आ. १९७५, प्रस्तावना, प्र.क्र. ३,४.

४१) संपादक डॉ. नागनाथ कोत्तापले, स्त्रीपुरूष तुलना, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रस्तावना पृ.क्र. ११.

४२) संपादक विलास खोले, स्त्रीपुरूष तुलना, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९७, प्रस्तावना, पृ.क्र. ५२.

४३) मृणालिनी जोगळेकर, स्त्री अस्मितेचा आविष्कार एकोणिसावे शतक भाग-३, ताराबाई शिंदे व जनाक्का शिंदे, पॉप्युलर प्रकाशन, पुणे, प्र.आ. पृ.क्र. ४१.

४४) शिंदे ताराबाई - स्त्री पुरूषतुलना, १८८२, संपादक - विलास खोले, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९७, प्र.आ. प्रस्तावना, पृ.क्र. ६२.

४५) शिंदे तारबाई - स्त्रीपुरूष तुलना, १८८२, संपादक डॉ. स.ग. मालशे, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, प्र.आ. १९७५, प्रस्तावना, पृ.क्र. १७.